महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासा अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.५६९/
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahdiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ५८७ दि. १५/०७/ २०१९

**विषय :** राज्य शासनाच्या निर्णयानुसार म.रा.वि.वि.कं.मर्या. मधील कर्मचाऱ्यांना दि. ०१ जुलै, २०१८ पासून सुधारीत दराने महागाई भत्ता मंजूर करणेबाबत.

**संदर्भ :** १) प्रशासकीय परिपत्रक क्र. ५७५ दि. २०.१०.२०१८.
२) शासन निर्णय क्र. मभवा-१३१९ / प्र.क्र.१३ / सेवा-९ दि. ०८.०७.२०१९.

महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या आधारे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितमधील कर्मचाऱ्यांसाठी सुधारीत दराने महागाई भत्ता मंजूर केला जातो.

२. आता, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. मभवा- १३१९ / प्र.क्र.१३ / सेवा - ९ दि. ०८.०७.२०१९ अन्वये महाराष्ट्र शासनाने, शासनाच्या सर्व पूर्णकालीक कर्मचाऱ्यांना दि. ०१ जुलै, २०१८, पासून असुधारित वेतनश्रेणीतील मूळ वेतनावरील (वेतनबँड मधील वेतन अधिक ग्रेड वेतन) अनुज्ञेय असलेल्या महागाई भत्त्याचा दर १४२% वरून १४८% केला आहे. तसेच, सदर शासन निर्णयाद्वारे हा सुधारीत दर दि. ०१ जुलै, २०१८, पासून देय करण्यात आला असून, दि. ०१ जुलै, २०१८ ते दि. ३० जून, २०१९ या कालावधीतील महागाई भत्त्याची थकबाकी रोखीने देण्यात यावी, अशा सूचना पारीत करण्यात आल्या आहेत.

३. आता, शासनाच्या धर्तीवर म.रा.वि.वि.कं. मर्यादितमधील सर्व कर्मचाऱ्यांना देय असलेला महागाई भत्त्याचा दर **१४२% ऐवजी १४८% असा दि. ०१ जुलै, २०१८,** पासून सुधारीत करण्याकरीता मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन), संचालक (वाणिज्य), संचालक (प्रकल्प) आणि संचालक (मासं) यांच्याशी विचारविनिमय करुन मंजुरी प्रदान केली आहे. या अनुषंगाने सदर सुधारित महागाई भत्त्याचा दर दि. ०१ जुलै, २०१९ पासून लागू करण्यात यावा.

४. उपरोक्त सुधारीत दराने दि. ०१ जुलै, २०१८ ते दि. ३० जून, २०१९ या कालावधीतील महागाई भत्त्यापोटीच्या फरकाची रक्कम **माहे जुलै, २०१९** च्या वेतनामध्ये समाविष्ट करून देण्यात यावी.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक महावितरण कंपनीच्या Employee Portal (Mitra) / e-library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

(कमांडर शिवाजी इंदलकर)(से.नि.)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)